

**सर्वण : नागरिकांची नेत्र तपासणी करताना नेत्र तज्ज्ञ डॉक्टर. बाजूस प्रवीण झांट्ये व मान्यवर.** (तुकाराम सावंत)

# प्रत्येकाने डोळ्यांची काळजी घ्यावी : प्रवीण झांट्ये

## सर्वण येथे १८० जणांची मोफत नेत्रचिकित्सा

**डिचोली, ता. १४ (प्रतिनिधी):** नेत्र हा शरीराचा अतिमहत्वाचा अवयव असून प्रत्येकाने आपल्या डोळ्यांची काळजी घ्यावी. वेळोवेळी तपासणी करावी, असे आवाहन आमदार प्रवीण झांट्ये यांनी केले आहे. गोवा पंचायत महिला शक्ती अभियानच्या डिचोली विभागातर्फे सर्वण येथे आयोजित मोफत नेत्रचिकित्सा शिबिराप्रसंगी आमदार झांट्ये बोलत होते. यावेळी महिला शक्ती अभियानच्या उपाध्यक्ष तथा कारापूरच्या पंच सुषमा सावंत, कारापूर-सर्वणचे सरपंच दामोदर गुरव, स्थानिक पंच गोकुळदास सावंत, लक्ष्मण गुरव, उत्तर गोवा जिल्हा पंचायतीच्या माजी अध्यक्ष अंकिता न्हावेलकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्वण फ्रेंड्स सर्कल क्लबच्या सभागृहात आयोजित या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात नेत्र तज्ज्ञ डॉक्टरांकडून १८० जणांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आल